**आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय**
दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.
Email- dcinsp.excise@maharashtra.gov.in, Tel. No. ०२२-२२६६३६८५

क्रमांक : बीपीए ११२०२१/९६/सात.                                                                                            मुंबई, दिनांक ०२ सप्टेंबर,२०२१.

वाचा :- १. शासन अधिसूचना क्र. बीपीए ०८१९/प्र.क्र.१४६/राउशु-२, दि.०७ जून, २०२१.
२. शासन अधिसूचना क्र. बीपीए ०८१९/प्र.क्र.१४६/राउशु-२, दि.०७ जून, २०२१.
३. शासन अधिसूचना क्र. बीपीए ०८१९/प्र.क्र.१४६/राउशु-२, दि.०७ जून, २०२१.

# परिपत्रक

**विषय :** देशी व विदेशी मद्य नियमात झालेल्या दुरूस्तीबाबत.

या विभागाकडून प्रामुख्याने महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे अधिनियमांची अंमलबजावणी करण्यात येते. या कायद्यांतर्गत विविध नियम शासनाने तयार केलेले आहेत. अबकारी अनुज्ञप्तीधारक यांच्या मागण्या, शासनाचे धोरण व महसुलाचे संवर्धनाकरिता या नियमामध्ये शासनाकडून काळानुरूप सुधारणा करण्यात येते. त्यानुसार संदर्भिय अधिसूचना अनुक्रमे क्र.१, २, व ३ अन्वये "महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३" चे नियम १९, २१ व २६ , "महाराष्ट्र विदेशी मद्य (रोखीने विक्री, विक्रीच्या नोंदवह्या इ.) नियम, १९६९" चे नियम ९ तसेच "विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२" चे नियम ५ यामध्ये सुधारणा केलेली आहे. सदर संदर्भिय अधिसूचना १ ते ३ या कार्यालयाचे पत्र क्रमांक बीपीए ११२०२१ / ९६ / सात, दि.२५ जून, २०२१ अन्वये कार्यवाहीस्तव कळविण्यात आलेले आहे. उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना पुढीलप्रमाणे सूचना निर्देशित करण्यात येत आहे.

१. अ) उपरोक्त प्रमाणे सर्व सीएल-२ अनुज्ञप्तीधारकांनी त्यांच्या अनुज्ञप्ती आस्थापनेमध्ये देशी दारूचा साठा व त्यात आढळून आलेली तुट / फूट किंवा देशी दारूचा पुरवठा करताना झालेली तुट / फूट निर्लेखित करण्यासाठी संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी स्पष्ट कारणे नमूद करून त्याबाबतचा लेखी अहवाल आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांना सादर करण्याची नियमात तरतूद होती. सदरची तरतुद अधिक्रमीत / रद्द केलेली असून सर्व संबंधित अधीक्षकांनी सीएल-२ अनुज्ञप्तीधारकांची तुट / फूट तात्काळ तपासून विहित असल्यास निर्लेखित करण्याचे उचित कार्यवाही त्यांच्या स्तरावरून करण्यात यावी.

ब) सीएल-२ अनुज्ञप्तीधारक / देशी दारू ठोक विक्रेत्यांनी अनुज्ञप्तीचे व्यवहार सकाळी ९ ते सायंकाळी ८ पर्यंत सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. सदर वेळे व्यतिरीक्त इतर कोणत्याही वेळी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मंजुरी दिल्याशिवाय अनुज्ञप्तींचे व्यवहार सुरू राहणार

नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

क) सीएल-२ अनुज्ञप्तीधारक / देशी दारू ठोक विक्रेता यांना अनुज्ञप्ती बंद ठेवणेबाबत कोरडे दिवस विहित केलेले आहेत. यामधील गांधी सप्ताहामधील ८ ऑक्टोबर या दिवशीचा कोरडा दिवस रद्द केला आहे याची नोंद घ्यावी.

२. नमुना एफएल-१ अनुज्ञप्तीचे व्यवहार रविवारी सुरू राहणार नाहीत. सदर अनुज्ञप्तीधारकांना इतर सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नमुना एफएल-१ अनुज्ञप्ती कार्यरत ठेवता येतील. याकरिता अतिरीक्त पर्यवेक्षण शुल्क ( ओव्हरटाईम चार्जेस) आकारू नयेत. याबाबत सर्व अधीक्षकांनी सर्व प्रभारी अधिकारी, एफएल-१ घटक अनुज्ञप्ती यांना अवगत करावे. तसेच सदर अनुज्ञप्तीचे व्यवहार विहित वेळेतच ऑनलाईन टिपीद्वारा होतील याची दक्षता घ्यावी.

३. फॉर्म ई, मायक्रोब्रेवरीज व रेस्टॉरंट- ब्रेवरीज या सौम्य बिअर व वाईन विक्री करण्यास अनुज्ञप्ती मंजूर असलेल्या आस्थापना बंद ठेवणेबाबत कोरडे दिवस विहित केलेले आहेत. यामधील गांधी सप्ताहामधील ८ ऑक्टोबर या दिवशीचा कोरडा दिवस रद्द केला आहे याची नोंद घ्यावी.

सर्व उपरोक्त अधिसूचना अंतर्गत सुधारणा आपल्या अधिनस्त सर्व अधिकाऱ्यांच्या व संबंधित अनुज्ञप्तीधारकांच्या निदर्शनास आणून पुढील योग्य ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

<u>**मा.आयुक्तांच्या मान्यतेने.**</u>

( सुभाष बोडके )
उप आयुक्त ( निरीक्षण ),
राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी.
२. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
३. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
४. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
५. या कार्यालयातील सर्व कार्यासने.